# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक ०१ | मुंबई | जुलै, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**
*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**
*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## बित्तंबात

**—सुहासिनी कीर्तिकर**

अगदी आत्ताआत्ताच दहावीचा निकाल लागला. अनेकजणांचे (म्हणजे माझ्या पिढीच्या अनेकजणांचे-) लगेच सुरू झाले. आमच्या वेळी 'फर्स्ट क्लास' मिळाला की आभाळाला हात लागायचे. एखाद्या विषयात पंच्याहत्तरच्यावर उडी मारली की खास गुणवत्ता. 'फर्स्ट क्लास वुइथ डिस्टिंक्शन'! आता काय? १९३ जणांना खेळाचेवगैरे गुण धरून शंभर टक्के गुण मिळाले म्हणे. म्हणजे भाषाविषय फक्त ऑब्जेक्टीव्ह प्रश्नांनीच तारला जातोय की काय? परवा एका वृत्तपत्रात व्यंगचित्र होतं पहा. मानसशास्त्रज्ञ म्हणताहेत की ज्यांना ९५, ९६ टक्के मार्क्स मिळालेत त्यांच्या नैराश्यासाठी समुपदेशनाची गरज आहे! किती छान भाष्य आहे त्या चित्रातून. असो. हे 'माझ्या पिढीचे' किंवा 'मागल्या वेळचे' चित्र किंवा वस्तुस्थिती जाऊ द्या. सोडून देऊया. पण एक लक्षात येतेय का? अलीकडे 'बातमी' हा प्रकार फारच डोक्यावर चढलाय, त्याला एखाद्या 'सेलेब्रिटी'सारखे फारच महत्त्व आले आहे. बातमी म्हणजे खबर. जे घडले ते नीट उलगडून लोकांसमोर ठेवणे. पण मिडियासंस्कृती बोकाळल्यापासून बातम्या चघळून चघळून, वेगात अन तेच ते बोलबोलून, उगाचच प्रसंगाठिकाणी असलेल्या प्रतिनिधीला त्याच त्याच वाक्यांचे दळण दळायला लावून सांगितल्या जातात; दाखविल्या जातात. म्हणा; त्यात बातमीदारांचे काय चुकले? त्यांच्या 'रोजीरोटीचा' सवाल असतो तो. 'टी.आर.पी.' नको वाढायला?

पण ज्या खऱ्याखुऱ्या 'अंदरकी बात' असणाऱ्या बातम्या असतात, त्या अल्लाद उडविल्या जातात. काहीच वर्षांपूर्वी (सुमारे २०१० मधली ही गोष्ट असेल) संजय काक यांच्या 'वर्ल्डस ऑन वॉटर' या शॉर्ट फिल्मला ब्राझिलच्या महोत्सवात सर्वोत्तम डॉक्युमेंटरीचा पुरस्कार मिळाला होता. तर त्याचवेळी मुंबईच्या 'इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल' मध्ये या डॉक्युमेंटरीवर बंदी आणली गेली. अरविंद सिंह यांच्या 'हावडा ब्रिज' वरही बंदी होती. गोध्रात जे हत्याकांड घडलं; त्यावर आधारित 'फायनल सोल्युशन' या डॉक्युमेंटरीलाही शासनानं केराची टोपली दाखवून बंदीच घातली. भागलपूर जेलमधील कैद्यांचे डोळे फोडण्याचं 'वीरकार्य' झालं, त्यावर सुहासिनी मुळे यांनी (सुहासिनी मुळे? अहो, त्यांचा गाजलेला 'भुवनशोम' चित्रपट आठवतोय ना?) 'अॅन इंडियन स्टोरी' केली होती. पण त्यावरही बंदी आणली होती. पण मला आठवत नाहीय की या बातम्या मीडीयानं चघळल्याचं. हां! समाजमनाला जरा चघळायला मिळेल अशा बातम्या मात्र अधूनमधून येतच असतात. 'रिक्शावाल्यानं विनयभंग करून तरुणीला चालत्या वाहनातून रस्त्यावर ढकलून दिले'... परत परत त्याची बातमी. मग एखादा कर्ता (?) राजकारणी म्हणेल की रात्री तरुणींनी एकट्याने प्रवास करू नये. पण नोकरीतील वेळेचं नियोजन, व्यवस्थापन बदलायचा विचार होणार नाही. नोकरदार स्त्रिया संरक्षण घेऊन फिरणार काय? (अन् तेही बाप्ये संरक्षक?) तरुणींनी पेहराव नीट घालावा. (रिक्शावाल्याच्या अनैतिक वागण्यावर असं अंगझाक पांघरूण?) पण गंमत म्हणजे या टी.आर.पी. वाढविणाऱ्या बातम्या असतात. एखाद्या मिलला, झोपडपट्टीला आग लागली की लगेच बातम्यांत दिसल्याच ज्वाला. कुणाकुणाची हळहळ अशावेळी ऐकवली जाते. मात्र शोधपत्रकारिता करणाऱ्यांना नक्की ठावे असते की जमीन मिळविण्यासाठी ही 'लावलेली आग' आहे; 'लागलेली आग' नाही. पण सामान्य माणूस असा बातम्यांतच गुरफटून रहावा याकरिता पडद्यावर दिसतात फक्त ज्वाळाच ज्वाळा. विचारांचा उजाळा नाहीच. 'जळो तुझा पिंजरा मेला, त्याचे नाव नको मला' असे चुकून एखादा विचारी चिमणाजीव म्हणालाच तर मग पंचाईतच ना! 'विकासा'वर 'विश्वास' असायलाच हवा. मग अशाच बातम्यांत हरवून जाणे श्रेयस्कर.

हां! दहावी परीक्षेचाच संदर्भ सुरूवातीला आलाय. तर अशीही बातमी लोकांना आवडतेच की रिंकूला (म्हणजे 'सैराट' वाली हो!) दहावीत किती टक्के मिळाले? 'इंग्रजीत सांगू का?' असा चित्रपटात संवाद फेकणाऱ्या रिंकूला इंग्रजीत ५९ गुण आणि सगळ्या विषयात ६६ टक्के गुण... ही बातमी तिच्या छबीसह परत, परत, परत, परत पडद्यावर दाखवली जाते. किती मोठ्ठी, थोर थोर बातमी हो?!! आपल्यासारख्या सामान्यांना या बातमीची भुरळच पडते की. बातमी कशी हवी? ती विरंगुळा म्हणून चारचौघांत चघळता आली पाहिजे. कोणत्या नटाचे कोणते सिनेमे येताहेत, फार फार तर कुणी कुणाला शिवीगाळ केली, कोणत्या गाडीला अपघात झाला, कोणत्या नटावर झालेल्या कारवाईत सूट मिळाली, कोणत्या जिल्ह्यात पाऊस धो धो कोसळला, कोणत्या रस्त्यांवर वाहनांची कोंडी झाली... अशा सगळ्या बातम्यांची बित्तंबातमी सर्वसामान्याला हवीच असते हो सर्वसामान्य ज्ञान वढविण्यासाठी. कारण त्याचे जगणे त्यामुळेच रंगतदार होत असते ना? एरवी त्याचे नीरस जगणे हीच एक बातमी व्हायची!

हे मात्र खरेच. सध्याचं सामान्य माणसाचं जगणं किती रटाळ झालेय ना? उगाच एखाद्या कबड्डी किंवा क्रिकेट खेळावेळी या माणसात चैतन्याचा श्वास फुंकला जातो. बाकी एरवी? विंदा करंदीकर म्हणतात त्याप्रमाणे 'सकाळपासून रात्रीपर्यंत तेच ते नि तेच ते. तेच माकडछाप दंतमंजन...'

हां! आता 'माकडछाप' न उरता माणसंच माकडछाप झाली आहेत. नि आता आहेत दंतमंजनाबिंजनाची काळजी घ्यायला आपले रामदेवबाबा! असोत, असोत. त्याबद्दल बोलून मला काय माझं आरोग्य बिघडवायचं नाही बाबा. हो! नाही तर 'वॉट्स अॅप' वर हीच बातमी फिरत राहील आपली. नकोच ते.

त्यापेक्षा बातम्यांवर डॉ. नंदू मुलमुले यांनी लिहीलेली एक कविताच देते इथे. म्हणजे मग वेगळे काही बोलाय-सांगायलाच नको ना! 'बातम्या' नावाची त्यांची कविता अशी आहे -

सकाळच्या बातम्या
दुपारच्या बातम्या
झोपेतून उठलेल्या
सरकारच्या बातम्या
टोलेबाजीच्या बातम्या
कुरघोडीच्या बातम्या
गरिबीने पिचलेल्या
बरगडीच्या बातम्या
अल्पवयीन बलात्काराच्या
स्वल्पकालीन बातम्या
सामूहिक दुष्कृत्याच्या
तत्कालीन बातम्या
निवडणुकीच्या बातम्या
जागा वाटप जागा वाटप
पाऊस इकडे डोळ्यांतून
टप टप टप टप
बंगल्याची सुरक्षा
सात रेसकोर्स रोड
पुतळ्याची विटंबना
तोड फोड तोड फोड
उमेदवाराचं नाव

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

टमाट्याचा भाव
पाऊस यंदा उशिरा
डरांव डरांव
अवैध वाहतूक
सक्तीची टोलवसुली
शाळकरी चिमुरडी
ट्रकखाली आली
ब्रेकिंग न्यूज
ब्रेकिंग न्यूज
कॅटवॉकवर पाय घसरला
एकच मौन!
उपोषण कुपोषण
बातम्यांचे खाद्य
कुणी उपाशी कुणी तुपाशी
चमचमीत न्यूज जराशी
कधी ह्याचा बाईट
कधी त्याचा बाईट
होऊ दे एकदाचा
टीआरपी राईट!
रिमोट दाबला खटखट
बदलली कूस
माणसांची बातमी
बातमीपुरता माणूस...

हां! पण आपल्या ज्ञातीतील परीक्षार्थींचे सुयश ही माझ्यासाठी खरोखरच आनंदाची बातमी आहे. सर्व विद्यार्थ्यांचे याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन. आपापल्या यशाबद्दलची बातमी माझ्यापर्यंत पोहोचवा बरं का. उगाच 'तुझं तू, माझं मी' (टीटीएमएम.) असं नको हं.

✳

*(डॉ. विनोद धुरंधर आणि सौ. अनुराधाकाकी हे 'प्रभुतरुण'चे आधारस्तंभ. प्रभुतरुणाच्या वाढदिवसाला त्यांच्याकडून बुंदीच्या लाडवांची भेट न चुकता ठरलेली. श्री. बन्सी धुरंधरांच्या घरी प्रभुतरुणाची सभा असली की डॉ. विनोद आणि सौ. अनुराधाकाकी आवर्जून हजेरी लावत. आमच्या उपक्रमांना हातभार लावत. आता अनुराधाकाकींच्या जाण्याने एक आधारस्तंभ निखळून पडला. त्यांना प्रभुतरुणाची कृतज्ञ भावांजली. सोबत त्यांच्याविषयीचे दोन लेख आणि कविता देत आहोत. -संपादक)*

# आमची काकी

**-सौ. सुरुची अनिल प्रधान**

सौ. अनुराधा विनोद धुरंधर. डॉ. विनोद आनंदराव धुरंधर यांच्या सुविद्य पत्नी.

काकी लग्न होऊन आमच्या धुरंधर घरात आली; त्यावेळेस मी व माझी बहीण बागेश्री, दोघीही शाळेत जात होतो. बंसी तर पाच-सहा वर्षांचा होता.

आमचे एकत्र कुटुंब होते. त्यामुळे काका, काकी घरातच होते.

तशी काकी ही आमच्या आईच्या माहेरच्या नात्यातली. आमची आई ही अतिशय प्रेमळ व सर्वांना सामावून घेणारी होती.

आईनेही काकीला आमच्या दोघींप्रमाणे मुलीसारखेच प्रेम व माया दिली. आमची आजी वार्धक्याकडे झुकली असल्याकारणाने घरातल्या सगळ्या गोष्टी काकी आईकडूनच शिकत असे. आईही तिला व्यवस्थित समजावून सांगत असे. त्यामुळे इतक्या वर्षात आई व काकींमध्ये कधी मतभेद झाले नाहीत व कधी वादावादीही झाली नाही.

सर्व सणावाराला आम्ही सर्वजण एकत्र जमत असू. आजही त्यात खंड पडलेला नाही.

२० वर्षांपूर्वी आई गेल्यावर काकीच आमची सर्वांची आई झाली होती. आम्ही दोघी बहिणी व आमची भावजय डॉ. सुरेखा, आम्हा तिघींवर तिचा जीव होता. बंसी, सुरेखा तर तिचे आधारवडच होते. काकीने आमच्यावर, आमच्या मुलांवर व आमच्या नातवंडांवरही खूप प्रेम केले.

'नानी निवास'च्या पायऱ्या चढल्यावर काकी दरवाजा उघडून हसतमुखाने समोर यायची व म्हणायची, ''या...'' त्या 'या' या शब्दातच सर्व माया भरलेली होती.

अशा या आमच्या काकीचे मंगळवार दिनांक ६ जून, २०१७ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.

यासमयी अनेक नातेवाईकांनी प्रत्यक्ष भेटून, फोन करून आम्हाला सांत्वनाचा आधार दिला. यावेळी माझा मुलगा व काकीआजीचा अमेरिकास्थित लाडका नातू अमित अनिल प्रधान याने त्याच्या काकीआजीबद्दलच्या भावना काव्यरूपाने पाठवल्या.

✳

## ANURADHA VINOD DHURANDHAR (NEE SIMANTINI KOTHARE)

**28TH October 1936 to 6th June 2017**

**-Ketaki Rajan Jayakar**

My eldest sister Sou. Anuradha Vinod Dhurandhar (nee Simantini Kothare) (Bai Mau to my children) passed away on Tuesday the 6th June 2017.

I still cannot come to terms with her passing away within a week's time!

Pretty as a picture, darling of her husband Dr. Vinod for the past sixty years was a thing of beauty and a joy for ever!. She was married when I was just seven years old. She was my mother for all purposes. Allways well dressed, she was a perfect complement for her handsome husband Dr.Vinod. Both of them were an evergreen couple, travelling all over the world, making lots of friends and keeping and nurturing friendships and relations. Her biggest assets were her family Nanasaheb (father-in-law), Mother-in-law, Dada and Vahini (Deer and Jaaubai), Tai and Doctor (eldest Nanand and her husband), Bansi, Surekha, Suruchi–Anil, Bageshri–Yogen, Nishad–Devashri, Paraj-Kajal, Kishore-Bharati and of course her children Nikhil-Chhona, Mihir, Rohan, Emilie and Armand!

She was fully Ekroop with her family, joyfully performed her family duties shared all their joys and sorrows and was the typical obedient daughter-in-law of the family. After Dada and Vahini passed away Bansi and Surekha gave my sister and Dr. Vinod all the respect due to the eldest members of the family. It was Bansi and Surekha who looked after Dr. Vinod and Bai Mau, since Nikhil is in the U.S., Bai Mau was the P.R. Department of the Dhurandhar family. All their achievements were promptly relayed to me. Never a whisper of complaint, nor a word of disapproval of her inlaws family. I deal with Divorce matters and I said to myself that if women were half as loyal to their inlaws and their families, the rate of Divorce would drop down dramatically!

She had shared all my happy moments and fully participated in my joy. I learnt so much from her about nurturing relationships, generosity, warmth, sharing and caring, but what I had not learnt during the past so many years I learnt sitting in the I.C.U at the Nanavati Hospital during the last week in her life. We had admitted her to the hospital for carrying out investigations, however she was admitted straight to the ICU. She was absolutely conscious and was worried about Doctor Vinod who is now being looked after at home.

Once she settled down in the hospital and after a few bottles of saline she was quite chirpy and shared a lot of wisdom with me, neither knew that those were going to be her last few days with me! Her Mantra in life was Love and forgiveness. The prayers that I

(Cont. on Page 6 col. 2)



### आज हरवली

बकुळीच्या शेजारी फुलली
मधुमालतीची फुले
रंगांची उधळण केली
लावूनी सौख्याचे झुले ।।१।।

उंच देठ फुलती पाकळ्या
नाजूक ही बांधणी
लांब दाट पाठीवरती
खुलली कायम वेणी ।।२।।

रंगरूपाचा नसेच भपका
शांत असे कायम
कोणावरी न ठेवी ठपका
नेहमी असे संयम ।।३।।

हसरा चेहरा असे स्वागता
कधी न दिसला राग
आज हरवली अकस्मात परि
'नानी निवास'ची जाग।।४।।

**-अमित अनिल प्रधान**

### ऋतुचक्र

तप्त झाली धरणी सारी
दिनकर होता कोपला
तीव्र किरणांच्या त्या दाहात
आसमंत सारा होरपळला
सारे प्राणी कासावीस झाले
फुले क्षणात कोमेजली
तृणे सारी पिवळी पडली
अन् आजीची माठे कामी आली
मानवाचा दिनक्रम मात्र
या वणव्यात नियमित होता
वृक्षांच्या भव्य छायेखाली
जीव त्याचा सुखावत होता
अन् अचानक चमत्कार झाला
काळे मेघ क्षितिजावरी अवतरले
मृगाच्या तुरळक धारांनी सजीव
निर्जीव सतेज झाले
मोरांना रंगबिरंगी पंख फुटले
चातक मनी तृप्त झाला
मानव मात्र या क्षणीही
आपल्या कामी गढून गेला.

**-हेमंत विनायकराव तळपदे**

✳

कथाकली

# स्पर्धा

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

अंजलीनं दिवाणखान्यातल्या सजावटीवरून पुन्हा एकदा नजर फिरवली आणि सुरेखाला म्हणाली - 'सुरेखा, तूसुद्धा पुन्हा एकदा नजरेखालून घाल हं सगळं! कसं अगदी व्यवस्थित टापटीप दिसलं पाहिजे घर.''

'वहिनी, तुम्ही उगीचच काळजी करताय. अहो, सगळ्यांपेक्षा तुमचाच दिवाणखाना फार सुंदर सजवलेला वाटतोय. खरं म्हणजे आजची पार्टी माझ्याकडची. पण नेहमीप्रमाणे ती तुमच्याच घरात देतेय मी... खरं तर आपण सख्ख्या जावा. फक्त वेगवेगळ्या फ्लॅटस्‌मध्ये राहतोय एवढंच. खरंच! तुम्हाला केवढी हौस आहे नाही?'

-सुरेखा असं म्हणेपर्यंत बायका यायला सुरुवात झालीच.

''ह्या बघा - मंजिरीताई आल्याच.''

''ए सुरेखा, तू मला फक्त मंजिरीच म्हण गं. मी अंजलीची ताई असले तरी तू मला ताई म्हणण्याची गरज नाही. अंजलीऽऽ ए.सी. लाव बाई.''

''ताऽऽई, सगळ्यांना येऊ दे की! तोपर्यंत दरवाजा उघडाच ठेवलाय मी. साऱ्याजणी आल्या की नंतरच बंद करून ए.सी.चालू करेन. काय म्हणताहेत भावोजी?''

''बरे आहेत की! त्यांच्या बिझनेसमध्ये एकदम बिझी आहेत.''

''असणारच! त्याशिवाय का बिझनेस चांगलाच चौखूर उधळलाय उमद्या वारूसारखा?'' उत्तरवजा प्रश्नच विचारला सुरेखानं..

एवढ्यात सगळ्याजणी आल्याच. त्यांच्याकडे बघून मंजिरी म्हणाली - ''अगं बिझनेसकडे लक्ष द्यायलाच हवं. त्याशिवाय का नवीन मर्सिडीज घेतली त्यांनी?''

''होऽऽऽ? नवीन मर्सिडीज घेतली?'' - सगळ्यांनी एकच प्रश्न विचारला.

''काय म्हणतेस ताई? अगदी पत्तासुद्धा लागू दिला नाहीस?'' अंजलीनं विचारलं.

''अगं, मलासुद्धा माहीत नव्हतं. कालच घेऊन आले ते माझी मोटार. मलाच आश्चर्याचा धक्का बसला बघ.''

''एऽऽ आजची पार्टी कोणाकडची ते सांगा आधी.''

''का गं? ते कळल्यानं काही फरक पडणार आहे का आशा?'' सुरेखानं मजेत विचारलं.

''हो गं - कारण पार्टी संपल्यानंतर थँक्स कुणाला म्हणायचं ते कळायला हवं नं?'' - आशानं उत्तर दिलं.

''मग असं करा - माझ्या नी वहिनींच्या दोघींच्या पार्ट्यांचे थँक्स वहिनींनाच देत जा. नाहीतरी पार्टी त्यांच्याच घरात होते'' - सुरेखा म्हणाली.

''नाही हं'' - ज्योतीनं विरोध दर्शविला - जिचं जे क्रेडिट ते तिलाच द्यावंच लागेल.''

''मग तरीही वहिनींनाच द्या - कारण माझ्याकडची पार्टी असली तरी घर सजवणं, सगळे पदार्थ निगुतीनं तयार करणं हे सगळं वहिनीच बघतात'' - सुरेखा म्हणाली.

''हो बाई! एवढ्या नामांकित सर्जनची बायको - नवऱ्याची सगळी कामं सांभाळून ही सगळं करते तरी कधी? अंजलीचं खरेच कौतुक करायला हवं..'' प्रत्येकजण थोड्याफार फरकानं हीच री ओढत राहिली.

''एऽऽ, तुम्हा सगळ्यांची स्तुती ऐकूनच पोट भरेल हं माझं! आणि मग मीच केलेले पदार्थ मलाच खाता येणार नाहीत...''

''बरं बरं... आता फार स्तुती नाही करीत. एऽऽ पण खाली होंडा सिटी कुणाची आहे गं? नवीनच वाटतेय...''

''ती माझी'... अंजली उत्तरली.

''बघा! मला म्हणत होती मर्सिडीज घेतली ते सांगितलं नाही म्हणून... आता स्वतः होंडा सिटी घेतली ते मात्र लपवून ठेवलं माझ्यापासून..'' मंजिरी कुरकुरली.

''ताई, तसं नाही गं. आज तुम्हाला सगळ्यांना सरप्राईज देणार होते मी ती गाडी दाखवून...''

''अरे वा! एकदम दोन दोन नवीन गाड्या बघायला मिळाल्या आज!'' ज्योती उद्‌गारली.

''ज्योती, तूसुद्धा आता नवीन गाडी घेऊन टाक बाई!''

''घेतली असती गं! पण घरात चार चार मोटारी पडल्यायत. आणखी पाचवी कुठे ठेऊ?''- ज्योतीनं हसत हसत विचारलं.

''पाचवी नको गं... एक जुनी काढून टाक..'' आशानं सुचवलं.

''ए हे हे... सोपं आहे का ते? अगं, एवढ्या मोठ्या अग्रगण्य वर्तमानपत्राचे मालक आम्ही... एक मोटार सासूबाईंची, एक मिस्टरांची, एक मोठ्या दिरांची आणि चौथी माझी, सुनंदा म्हणजे माझी जाऊ गं तिची नी मुलांची...''

''सुनंदाला नाही लागत मोटार?''

''छे गं! ती घरकोंबडी आहे. सदान् कदा घरात...''

''हो - पण घर सांभाळणं हेही मोठंच काम असतं की!'' - सुरेखा उद्‌गारली.

''अगं, आपल्यासारख्यांना घर सांभाळणं ही काय मोठी गोष्ट आहे? घरात नोकर असतातच की दिमतीला!'' अंजलीनं सुरेखाचं म्हणणं खोडून काढलं.

''ते खरं.. पण सुरेखाचं म्हणणं बरोबर आहे. सुनंदा घराची सर्वच जबाबदारी उचलते म्हणजे मोठ्या पार्ट्या अ‍ॅरेंज करणं, त्या पार्ट्यांना कुणाला बोलवायचं त्यांची यादी करणं, त्याप्रमाणे आमंत्रणं पाठवणं ती ज्या वर्तुळासाठी पार्टी असेल, त्याप्रमाणे पार्टीचा मेन्यू ठरवणं हे सगळं तीच बघते.''

''पण मग घरातल्या मुलांकडे, त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष कोण पुरवतं?'' सुरेखानं विचारलं.

''ते करायला त्यांच्या ट्यूशन टीचर्स, घरातल्या हाऊस कीपर्स आहेतच की! आता तर आणखी नवीन क्षेत्रात पाय रोवतोय आम्ही...'' हे सगळं सांगतांना ज्योती माना वेळावून बोलत होती. त्यामुळे तिची हिऱ्याची कर्णभूषणं नी गळ्यातला हिऱ्यांचा नाजूक नेकलेस सगळ्यांचं लक्ष वेधून घेत होता.

ते बघून अंजली कासावीस होऊन आत गेली नी हिऱ्यांच्या मोठ्या पदकाच्या नेकलेससहीतच परत आली.

ते बघताच मंजिरी चित्कारली - 'अय्या! कुठून घेतलास? जवळपास माझ्या नेकलेससारखा आहे की हा!..''

''काहीतरीच काय ताई! तुझा जुन्या फॅशनचा आहे. हा नेकलेस अगदी लेटेस्ट फॅशनचा आहे.''

ज्योती, आशा, सुचित्रानं नेकलेस बघून न बघितल्यासारखं केलं..

'खरंच! अगं विचारायचं राहूनच गेलं - अगं, हल्ली दोन तीन पार्ट्यांना म्हणजे चितळे केमिकल्सवाल्यांच्या, खोजा ब्रदर्सकडच्या नव्या शोरूमच्या उद्‌घाटनाला, चंदिरामानीच्या नव्या फिल्मच्या प्रिमिअरच्या पार्टीला दिसला नाहीत ते तुम्ही दोघं?'' - अंजलीनं सुचित्राला विचारलं - ''अं.. की आमंत्रणच नव्हतं तुम्हाला?''

''आमंत्रणं कशी नसतील? रोज अशी ढीगभर आमंत्रणं असतातच. पण आम्ही गेल्या महिन्याच्या पाच तारखेपासून लंडनला होतो. परवाच परत आलो.''

प्रत्येकीच्या थापा चालूच होत्या. प्रिया म्हणत होती - ''अंजली सगळे पदार्थ खूप छान करते नाही.''

त्याचवेळी सुरेखाला आठवत होतं कोपऱ्यावरचं एका स्त्रीमंडळानं चालवलेलं रेस्टॉरंट नी त्यांच्याकडे नोंदवलेली भिशी पार्टीसाठीची ऑर्डर... तिनंच तर नोंदवली होती.. पण खाताना प्रत्येकीच्या तोंडी स्तुती होती ती अंजलीची. तिच्या चेहऱ्यावर विचित्र भाव उमटले. पण तिला त्याचवेळी सगळ्यांच्या चेहऱ्यावरचे भाव तसेच वाटले. याचा अर्थ प्रत्येकीला ही खुबी माहीत आहे आणि प्रत्येकजण स्वत:कडच्या प्रत्येक पार्टीला हीच युक्ती खुबीनं वापरत असणार.. सुरेखाला या सर्व प्रकाराची एकदम शिसारी आली. सगळाच खोटा दिखावा. ढोंग.. ते गोड बोलणं... एकमेकांची स्तुती करणं... पदार्थांची वाखाणणी करणं... नवऱ्यांच्या हुद्यांची किंवा व्यवसायाची शेखी मिरवणं...

आणि या सगळ्यांतून मनापासून फक्त एकच गोष्ट साधणं... ती म्हणजे चढाओढ. एक जीवघेणी

(पान ५ कॉलम ३ वर)

**हसरी रेखा** **-प्रदीप कोठारे**



भूतांच्या गोष्टी-भाग ४

# अद्‌भूत गोष्टींचा संग्रह

*(काही लोकांनी सांगितलेले त्यांचे अनुभव)*

-विनय त्रिलोकेकर

## झपाटलेले घर?

आनंद (नावात बदल करून ) आणि शकुंतला (नावात बदल करून) कित्येक वर्ष एकमेकांबरोबर फिरत होते, अगदी कॉलेजच्या दिवसांपासून. बऱ्याच उशीरा का होईना, अखेर दोघांचे लग्न झाले. दोघांच्या घरून विरोध वगैरे असे काही नव्हते. आनंदच्या आई-वडिलांचे चिराबाजारातील घर लहान आणि त्यात तीन भाऊ आणि दोन बहिणी, असा मोठा लोटलीकर (नावात बदल करून) परिवार. आनंदला लग्न केल्यानंतर बाहेर पडणे आवश्यक होते. पैशांची जमवाजमव - कर्ज मिळवणे, यासाठी बराच काळ लागला. आता दोघांचे - राजा आणि राणीचे स्वतंत्र असे एक १ BHK, वा एक स्टुडिओ अपार्टमेंट म्हणा, पण त्यांचे आपले स्वत:चे असे घर झाले होते. पृथ्वीवरील त्यांचा स्वर्ग म्हणा! घर तसे लांबच होते, मुंबईच्या उपनगरात. (ठिकाण गुप्त ठेवणे गरजेचे). लग्न झाले, मधुचंद्र आटोपला आणि नवविवाहित जोडप्याचा चिराबाजारातील जुन्या घरी काही दिवस मुक्कामही झाला. मुहूर्त बघून नव्या घरात 'गृहपूजा' आणि त्याचबरोबर 'सत्यनारायणाची पूजा' करण्याचे ठरवण्यात आले. सारा लोटलीकर परिवार पूजेसाठी आनंदच्या घरी आला. पूजेचा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात पार पडला. 'हाऊस-वॉर्मिंगचा' सोहळा झाला. सर्व पाहुणेमंडळी तीनचार दिवस आनंदच्या नव्या घरीच मुक्काम ठोकून राहिले होते.

आज शनिवार होता. सारे सकाळचे जेवण उरकून आपापल्या घरी जाण्यास निघाले. एकेकाला निरोप देता देता संध्याकाळ उलटलीच. नंतर दोघे नवविवाहित बाहेरून फेरफटका मारून आणि भेळ, दहीवडा असे हलकेफुलके खाऊनच घरी परतले.

दोघांना प्रथमच इतक्या दिवसानंतर एकांत मिळत होता. पण शकुंतला पार दमून गेली होती. ती झोपण्यास गेली. आनंदला आपल्या हातात असलेली कादंबरी संपवायची होती. थोडीच पाने शिल्लक असल्याने ती संपविणे बरे असे त्याला वाटले.

आनंद सर्व आटपून झोपण्यास गेला तेव्हा शकुंतला गाढ झोपली होती. दिवे 'स्वीच ऑफ' केले आणि तो हलक्या पावलाने, बिलकुल आवाज न करता पलंगावर तिच्या शेजारी जाऊन निजला. थोड्याच वेळात तोही झोपी गेला. आपण स्वत: आणि आपल्या बायकोचे सुखद स्वप्न पाहू लागला. शकुंतलेच्या किंकाळीने तो खडबडून जागा झाला. 'बापरे! ही कोण? आली कशी?' समोरील भिंतीकडे बोट दाखवून ओरडत होती आणि त्याच दिशेने डोळे फाडून बघत होती. समोरील दृष्य पाहून तोही हबकलाच. समोरच्या खिडकीजवळ एक सुंदर महिला जमिनीवर लोळत पडली होती. तिचा पोशाख- हिरवे नऊवारी भरजरीचे लुगडं, त्याच रंगाचा ब्लाऊज, हातात हिरवा चुडा, कपाळावर लालभडक भली मोठी कुंकुवाची चंद्रकोर, डोक्यापासून पायापर्यंत दागिन्यांनी मढलेली, एक नवविवाहित तरुणी वाटत होती ती. ती त्या दोघांकडे रागीट नजरेने एकटक पाहत होती. दोघेही भीतीने अगदी गारठून गेले. घशाला कोरड पडली. शब्द फुटत नव्हते. त्याला एवढेच करता आले- शकुंतलेस आपल्या जवळ ओढून आपल्या मिठीत घेतले. तिच्या छातीचे धाड-धाड ठोके त्याच्या स्वत:च्या धडधडीमध्ये विलीन झाले. त्याने अंगावरील पांघरूण अधिकच घट्ट दोघांभवती लपेटून घेतले. तिने मात्र आपली नजर समोरील दृष्यापासून हटवित आपले डोके आनंदच्या छातीत घुसवले. तिच्या पापण्यांची होणारी उघडझाप, अधूनमधून हुंदके, ती जागी होती ते त्याला जाणवत होते. खोलीतील घड्याळाचे ठोके त्याने ऐकले. ठण - ठण -ठण - मोजून १२ ठोके. काही वेळाने ती झोपली याची त्याला जाणीव झाली. तो मात्र रात्रभर जागाच होता आणि हळूच पांघरूणातून आपले डोके बाहेर काढून अधूनमधून त्या बाईकडे बघत होता. घड्याळाच्या होण्याऱ्या ठोक्याने त्याने जाणले - रात्रीचा एक वाजला, दोन वाजले, तीन वाजले आणि चारचे ठोकेही ऐकले. कोंबडा आरवण्याचा आवाज ऐकला. आता समोरील ते भयानक दृष्य एखादे चित्र असल्यागत पुसट होत गेले आणि काही वेळात पूर्ण नाहीसे झाले. त्याने अलगद बायकोचे डोके आपल्या छातीवरून बाजूला केले. तिच्या अंगावरील पांघरूण नीटनेटके करून पलंगावरून खाली उतरला. ती शांत झोपली होती.

उठल्यावर ती म्हणाली, ''काल रात्री मला भयानक स्वप्न पडले.''

पण ते स्वप्न नव्हते हे त्याला ठाऊक होते. ती वस्तुस्थिती होती, एक सत्य होते आणि त्याच रात्रीपुरते ते मर्यादित राहिले असते तर वाटले असते की दोघांना झालेला एक भास होता. पण दुसऱ्या रात्रीही तोच प्रकार. तिसऱ्या रात्रीची वाट बघण्याचे धाडस त्यांच्यात राहिले नाही. सकाळीच गाशा गुंडाळून दोघेही आनंदच्या जुन्या घरी रवाना झाले आणि आजही ते तेथेच राहत आहेत. मात्र ही गोष्ट त्यांनी फक्त निवडक व जवळच्या व्यक्तींनाच सांगितली आहे. ह्याचे कारण म्हणजे ते घर विकावयाचे आहे. मग उगाच गवगवा कशासाठी? काय हो, त्या तेथे एक रात्र काढण्यास तयार आहात का तुम्ही?

✳

# सारे प्रवासी घडीचे

-प्रणिता प्रभाकर

एकदा एक तरुणी बसमध्ये चढली व एका जागेवर जाऊन बसली. लगेचच दुसऱ्या बसथांब्यावर एक भयंकर व वृद्ध महिला जोराने हालचाल करीत बसमध्ये चढली व त्या तरुणीच्या बाजूला येऊन स्वत:ला आवळून चिवळून बसली.इतकेच नव्हे तर; तिच्या जवळील भले मोठे सामानसुद्धा आदळआपट करीत त्या तरुणीच्या बाजूला ठेवले.

त्या तरुणीच्या बाजूला बसलेले एक गृहस्थ हा घडलेला सर्व प्रकार पाहून चिडले व वैतागून त्या तरुणीला त्यांनी विचारले की, ''तुम्ही गप्प का बसलात इतके सर्व घडूनही? तिला दोन शब्द सुनावले का नाहीत तुम्ही?''

तेव्हा ती तरुणी स्मित हास्य करून उत्तरली, ''इतक्या शुल्लक कारणासाठी उद्धट/उद्दामपणे बोलणे किंवा वाद घालणे जरुरीचे नाही. हा एकत्र प्रवास किती औट घटकेचा आहे. मी पुढील थांब्यावर उतरणार आहे.''

त्या तरुणीने दिलेले हे उत्तर खरे पाहता सुवर्णाक्षरात लिहिले जाणे योग्य आहे.

'एखाद्या शुल्लक कारणावरून वाद घालणे जरुरीचे नाही. आपला एकत्रित प्रवास किती कमी अवधीचा आहे.' आपण प्रत्येकाने हा विचार करायला हवा की, हे अर्थशून्य वाद, भांडणतंटे, क्षमाशील नसणे, असमाधानी वृत्ती किंवा दुसऱ्याला सतत टोमणे देणे वा घालून पाडून बोलणे, त्यांच्यातील चुका दाखवणे ह्या सर्वांनी आपले मौलिक आयुष्य झाकोळून टाकणे म्हणजे आपला अमूल्य वेळ व उत्साह किंवा ताकद वाया घालवणे होय.

जर कोणी आपल्याला वेदना होतील असे शब्द वापरले तर तुम्ही स्वत:ला सावरा,मन शांत ठेवा. कारण आपल्या आयुष्याचा हा प्रवास फारच कमी अवधीचा आहे.

समजा एखाद्या व्यक्तीने तुमचा विश्वासघात केला, फसवले, धोका दिला किंवा मानहानी/ अवमान केला तर तुम्ही शांत राहा,चिडू नका. प्रसंगी क्षमाशील व्हा, कारण आपला हा प्रवास फार थोड्या वेळाचा आहे.

कोणीही कितीही आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला किंवा त्रास दिला तरीही प्रत्येकाने एक गोष्ट मात्र आवर्जून लक्षात ठेवावी की आयुष्याचा एकत्रित प्रवास हा फारच थोड्या अवधीचा आहे.

हा एकत्रित प्रवास किती काळ चालणार आहे /करावयाचा आहे हे कोणालाही माहीत नसते व ह्या एकत्रित प्रवासातून आपण कधी उतरणार आहोत हे ही आपल्याला माहीत नसते. कारण आपल्या आयुष्याचा एकत्रित प्रवास किती अल्प काळाचा आहे.

म्हणूनच आपले कुटुंबीय व मित्रपरिवाराला आनंदी ठेवा. एकमेकांचा आदर करा/सन्मानाची वागणूक द्या. एकमेकांप्रती दया,लोभ व क्षमाशीलता दाखवा. स्वत: उपकृत राहा, दुसऱ्यांना उपकृत करा व आनंदी राहा.

कारण एकच आहे, शेवटी आपण सर्व प्रवासी औट घटकेचे आहोत.

('अनुवाद व्हॉट्स् अॅपच्या सौजन्याने')

✳

## नोंद घेण्याजोगे...

'लोकसत्ता'च्या 'लोकरंग' पुरवणीत विनायक जोशी यांच्या स्वरभावयात्रेत गायिका मोहनतारा अजिंक्य यांच्या गायकीची दखल घेतली गेली आहे. 'जाणार आज मी माहेराला, ओटी भरा गं ओटी भरा...' हे त्यांचे गीत अनेकांच्या आजही आठवणीत आहे. 'मोहनतारा यांचा मधुर धारदार स्वर उत्तम गाण्याचा आनंद देतो' असा विशेष लेखकाने सांगितला आहे. त्यांच्या 'खुदकन् गाली हसले...' या गीतातीलही गायनातल्या हरकती, मुरके यांतून दिसणारा मोहनतारांचा रियाज त्यांनी वाखाणला आहे. 'चल चांदण्यात सजणा' आणि 'तुझ्या प्रीतीच्या हाकेला' ही गीते तर आजच्या पिढीला अपरिचितच. 'झोक्याला घेऊ या बाई,' 'तुझी नि

(पान ६ कॉलम ४ वर)

# तीन संस्थांचे रंगलेले सामने

पाठारे प्रभु सोशल समाज, हौशी कलामंदिर व पाठारे प्रभु को-ऑप. हा. सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने कॅरम व 'बेझिक'चे सामने खारच्या पाठारे प्रभु को-ऑप. हा. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात झाले. सकाळी ९ वाजल्यापासून ते रात्री ९ वाजेपर्यंत उत्तरोत्तर सामन्यांची रंगत चढतच गेली. ज्ञातीयांनी सर्व स्पर्धकांना उस्फूर्त दाद दिली. छोट्या बच्चे कंपनीनेही उत्साहाने कॅरममध्ये भाग घेतला.

सामन्यापूर्वी सर्वांना सकाळचा नास्ता व चहा डॉ. सौ. प्रिया व श्री. सुधीर धुरंधर ह्या दांपत्याने दिला. दुपारच्या जेवणासाठी चिकन बिर्याणीची व्यवस्था करण्यात आली होती, त्याबरोबर सौ. नीता सेंजित यांनी गोड जिलेबी प्रायोजित केली. तसेच अनामिक दात्याकडून देण्यात आलेल्या केकने लज्जत वाढली. दुपारचा चहा सौ. अमिता व श्री. दिलीप मानकर ह्यांनी दिला तर; संध्याकाळी सौ. नीता मिलिंद सेंजित व श्री. अभिजित सुरेश विजयकर ह्यांनी सर्व उपस्थितांना समोसे व बटाटवडे प्रायोजित केले होते. अनामिक दात्याकडून शीतपेयही देण्यात आले. या सर्व खानपानाची व्यवस्था श्री. सुधीर बाबुराव धुरंधर ह्यांनी उत्तमरित्या सांभाळली.

कार्यक्रम समितीचे सभासद सौ. नीता सेंजित, श्री. जयंत कीर्तिकर, श्री. विजय धुरंधर, श्री. प्रसाद कीर्तिकर, श्री. अतुल व श्री. अजित मोरेश्वर जयकर, श्री. सुधीर धुरंधर, श्री. सुनील जयकर आणि विशेषत: श्री. रोहील ज्ञानेश जयकर ह्यांनी त्या दिवसाच्या सामन्यांची सर्व व्यवस्था स्वत: एकट्याने केली होती व इतरांनी उत्तमरित्या एकमेकांना साथ देऊन हे सामने यशस्वी करून दाखविले.

पाठारे प्रभु को-ऑप. हा. सोसायटीचे अध्यक्ष श्री. अशोक विनायक तळपदे यांनी कॅरम बोर्डरर स्ट्राईक करून सामन्याला सुरुवात केली. हौशी कला मंदिरच्या श्री. अतुल जयकर यांनीही उपस्थितांचे स्वागत केले.

सामन्यातील यशस्वी विजेत्यांना श्रीमती स्वाती राणे, श्री. प्रसाद कीर्तिकर व सौ. अमिता मानकर ह्यांच्या हस्ते स्मृतिचिन्हे प्रदान करण्यात आली. ही स्मृतिचिन्हे श्री. सुनील माधवराव धैर्यवान ह्यांनी आपले पुत्र कै. धवल सुनील धैर्यवान ह्यांच्या स्मरणार्थ प्रायोजित केली होती.

बेझिक सामन्यात महिला विरुद्ध पुरुष असा सामना रंगत गेला व शेवटी स्त्री शक्तीचा विजय झाला.

स्पर्धक विजेत्यांची नावे अशी-
बेझिक: विजेता संघ- सौ. नीता सेंजित, सौ. प्रतिमा विजयकर, सौ. निलन धैर्यवान.
उपविजेते- श्री. दिपक धैर्यवान, श्री. अजित त्रिलोकेकर, श्री. अशोक विजयकर.
कॅरम: महिला एकेरी- विजेती:- श्रीमती प्रतिमा कीर्तिकर-राजे
उपविजेती:- कु. दिप्ती राजन विजयकर
पुरुष एकेरी- विजेता:- श्री. राजेश सुशील धैर्यवान
उपविजेता:- श्री. आशिष विवेक देसाई.
महिला दुहेरी विजेत्या:- श्रीमती प्रतिमा कीर्तिकर-राजे, कु. दिप्ती राजन विजयकर
उपविजेत्या:- श्रीमती हेमा रामचंद्र जयकर, सौ. दिपश्री सुदीप कोठारे.
पुरुष दुहेरी विजेते:- श्री. अक्षय सुदीप कोठारे, श्री. राज मानकर.
उपविजेते:- श्री. रश्मिन प्रवीण राणे, श्री, भूषण प्रवीण राणे.
मिश्र दुहेरी (मिक्स डबल्स) विजेते:- कु. दिप्ती राजन विजयकर, श्री. चंदन राजन विजयकर.
उपविजेते:- सौ. दिपश्री सुदीप कोठारे, श्री. अक्षय सुदीप कोठारे.

पाठारे प्रभु को-ऑप. हाऊसिंग सोसायटीचे अध्यक्ष श्री. अशोक तळपदे यांनी ज्ञातीच्या सर्व संस्थांनी एकत्र येऊन प्रभु भवन स्थापण्याविषयी इच्छा व्यक्त केली. त्यांनी सभागृह उपलब्ध करून दिले. या प्रसंगी अनेक देणग्यांचा वर्षाव झाला. त्या देणग्यांचा तपशील:-

सोशल समाज देणग्या:-
१) कु. दिप्ती राजन विजयकर रु.३०००/-
२) श्रीमती अश्विनी गिरधर राणे रु. १००१/-
३) श्री. अशोक विनायक तळपदे रु. १०००/-
४) सौ. निलन व श्री. दिपक माधवराव धैर्यवान रु. १००१/-
५) श्रीमती किशोरी शंकर त्रिलोकेकर, श्री. प्रसाद शंकर त्रिलोकेकर व सौ. प्रणोती मिलिंद कीर्तिकर कडून कै. श्री. शंकर गजानन त्रिलोकेकर स्मरणार्थ रु. १००१/-

हौशी कला मंदिरला आलेल्या देणग्या अशा:-
१) श्री. अतुल मोरेश्वर जयकर रु. ३०००/-
२) श्री. सुनील मनोहर जयकर रु. १५००/-
३) श्री. अशोक विनायक तळपदे रु. १०००/-
४) सौ. निलन व श्री. दिपक माधवराव धैर्यवान रु. १००१/-

हौशी कलामंदिरचे श्री. अजित जयकर यांनी सामन्याच्या होणाऱ्या प्रत्येक सभेसाठी आपले निवासस्थान उपलब्ध करून दिले.

*

# पाठारे प्रभु सोशल समाज- वर्षासहल

पाठारे प्रभु सोशल समाजाची एक दिवसीय वर्षासहल रविवार दिनांक २ जुलै, २०१७ रोजी खोपोली येथील 'यु केज रिसॉर्ट' येथे नेण्यात आली. नेहमीच्या उत्साहाने काही जुने, काही नवीन मिळून छोट्या विवानसह ४६ सभासद सहलीत सहभागी झाले होते. सहलीची मोठी ए.सी. बस चर्नीरोडवरून निघून बोरीवली-पर्यंतच्या सभासदांना घेऊन निघाली. पर्जन्यराजही खूष होते. सकाळची थंडगार हवा, कमी अधिक प्रमाणात कोसळणाऱ्या सरी, बसमधील गप्पागोष्टी, विनोद, गाणी करता करता महडच्या गजाननाच्या द्वारी मंडळी पोहोचली. दर्शनानंतर रिसॉर्ट जवळच होता.

गेल्या गेल्या नाश्ता झाला. त्यानंतर दोन खोल्यांमधून सर्वांनी आपले सामान ठेवले आणि हौशी लोकांनी आपला मोर्चा स्वीमिंग पुलाकडे वळविला. आकर्षक पद्धतीने आयोजित रेनडान्सचाही मंडळीनी आनंद लुटला. डुंबून थकल्यावर मंडळीनी भोजनाकडे आपले पाय वळविले. सर्वांनी भोजनाचा यथेच्छ आस्वाद घेतला.

त्यानंतर 'पासिंग द पार्सल', संगीत खुर्ची, हाऊजी यासारख्या खेळात सर्वजण सहभागी झाले. त्यात भरपूर बक्षिसे देण्यात आली. ही बक्षिसे संयुक्त चिटणीस यांच्यातर्फे तर हाऊजीच्या लकी नंबर्सची पाच बक्षिसे उपाध्यक्षा श्रीमती स्वाती जयकर यांच्यातर्फे देण्यात आली. सर्वात वयस्कर म्हणून श्रीमती किशोरी शंकर त्रिलोकेकर, सर्वात छोटा विवान, सहलीची रक्कम प्रथम भरणारे श्री. विजय कीर्तिकर यांना बक्षिसे देऊन सन्मानित केले. ही सर्व बक्षिसे विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर यांच्या हस्ते देण्यात आली. त्यानंतर सुरू झाली परतीची वाट.

बसमध्ये सकाळी मंडळींना समाजातर्फे फरसाण व लाडूचे पॅकेट, श्री. श्रीकांत विजयकरांकडून कचोरी, विश्वस्त श्रीमती वंदना नवलकरांकडून खारी पुरी, श्री. दिलीप कोठारेंकडून नटीज, कु. विवान आगासकरकडून चॉकलेअर्स, श्री. अभिजीत विजयकरकडून मेलडी आणि श्री. तुषार कीर्तिकरकडून फाइव्हस्टार चॉकलेटस् वाटण्यात आली

अशा तऱ्हेने पावसाळी सुहाना सफर आनंदात पार पडली.

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

स्पर्धा, आपल्याकडे काय काय आहे ते दाखवण्याची स्पर्धा, त्याचबरोबर दुसरीच्या उणीवांवर बोट ठेवण्याची स्पर्धा, तेही सगळं नकळत झालं असावं असं वाटावं इतक्या सहज खुबीनं करणं...

खरं तर सुरेखाला या ग्रुपच्या भिशीमध्ये मुळीसुद्धा रस नव्हता. फक्त अंजलीच्या नात्यामुळे, अंजलीसाठी आणि अंजलीच्या आग्रहाखातर ती ह्या ग्रुपमध्ये आली होती.

''एऽऽ - आता नावाची चिठ्ठी काढू या हं... अंजली चिठ्ठ्या लिहिल्यायस नं? मागच्या महिन्याला आशाला लागली होती नं भिशी? आशा तू भाग्यवान चिठ्ठी काढायचीयस...' ज्योती म्हणाली.

आशानं चिठ्ठी उचलली आणि उघडून वाचली - ''सुरेखा''

''अरे वा! सुरेखा... छानच की! पार्टी ही तुझी आणि नावही तुझंच?.. एऽऽ अंजलीऽऽ सगळ्याच चिठ्ठ्यांवर 'सुरेखा' नाव नव्हतं लिहिलंस नं?''- आशानं फिरकी घेतली.

''चला - काढा प्रत्येकीचे पाच पाच हजार रुपये''- अंजली म्हणाली.

सुचित्रानं सगळ्यांचे पैसे गोळा केले आणि सुरेखाला दिले.

''सुरेखा, काय घेणार या पैशांमधून?''- आशानं विचारलं नी पुढे म्हणाली- ''असं कर तू इंपोर्टेड साड्या घे - यांनी या ट्रीपच्या वेळी खूप छान साड्या आणल्यायत... सगळ्याच या बघायला... हवी ती साडी घ्या... कधी येताय?'' आशानं साड्या खपवायचा जोरदार प्रयत्न केला...

''अं... बघू या...''

''फोन करून ठरवू...''

''मी आत्ताच घेतल्या गं. ठेवायलाच जागा नाही आता.''

प्रत्येकजण हळूच त्या साड्यांच्या घोळातून काढता पाय घेत म्हणत होती...

या गोष्टीचासुद्धा सुरेखाला तिटकाराच वाटला. कशा या कणाहीन बायका - फक्त नवऱ्याच्या कर्तृत्वावर पैशांची मिजास दाखवणाऱ्या... कोणाच्याही कोणत्याही वाक्याचा फायदा घेत फक्त स्वत:च्या श्रीमंतीचं प्रदर्शन करण्याची ही स्पर्धा... संपत्तीच्या वास्तवाच्या जोरावर मनोराज्यांचे इमले बांधणारी स्पर्धा... स्वत:च्या कणखर कर्तृत्वाचा भरभक्कम पाया नसणारी डळमळीत स्पर्धा... आणि त्या स्पर्धेचं तकलादूपण जाणवल्यानं पुन्हा पुन्हा ऐहिक सुखांचा आभास निर्माण करण्याची स्पर्धा...

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| १९-६-१७ | कु. श्रद्धा संदीप नवलकर | श्री. सतीश यशवंत राजाध्यक्ष (आं.ज्ञा.) |

### मरण

| | | |
|---|---|---|
| १८-५-१७ | श्री. आशीष शशिकांत कोठारे | वय ४८, खार |
| २१-६-१७ | श्री. अंजन मंगेश धुंडिराज कोठारे, | वय ५९, वसई |

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. सुप्रिया उमेशचंद्र कीर्तिकरकडून रु. १००१/-

✶ सौ. सुरेखा आणि मनोहर विनायक नवलकरकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त रु. १०००/-

✶ श्री. शैलेंद्र एस्. धुरंधर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✶ सौ. अंजली एम्. धराधरकडून त्यांचे सुपुत्र पराग दहावी झाल्याप्रीत्यर्थ रु. ५००/-

✶ सौ. शोभा नंदकुमार धैर्यवान यांजकडून त्यांची नात कु. अवनी हिच्या पहिल्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. २५०/-

सर्व देणगीदारांचे आभार.

✳

## परीक्षेतील सुयश

### दहावी

कु. सानिया नितीन नवलकर, ९३%
कु. लीना नील कीर्तिकर, ९२.८%
श्री. वेदांत नरेंद्र धैर्यवान, ९२%
श्री. पराग मिलींद धराधर ९०.८%
श्री. नील सतेज राणे ८०%
कु. तनिषा नीतिन देसाई, ६८%

### चुकीची दुरुस्ती

✶ गेल्या अंकातील प्रभुतरुणास देणगीमध्ये श्री. संदीप प्रबोध देसाई याऐवजी **श्री. संदीप शरद देसाई** असे वाचावे.

✶ गतांकी संपादकीयात 'जिलेबी वृंदा जयकरकडून असा उल्लेख आहे. **सौ. नीता सेंजित** यांच्यातर्फे जिलेबी देण्यात आली होती. दिलगीर आहोत.

✳

(Cont. from Page 2 col. 3)

recited for her in the I.C.U. were the only things I could offer her. I genuinely did not think that she will go away leaving Dr.Vinod, however the moving finger writes and having written moves on! On Sunday evening she became critical, we all rushed to the hospital, she was conscious, but very weak, Monday went by, Tuesday morning she became serious and in the evening she passed away!

The funeral was as beautiful as her life. All her near ones and dear ones attended it, everyone shocked at her sudden demise! She looked like a Devi dressed in a green saree, red kumkum on her milk white forehead, feet painted with red kumkum, she got the final goodbye as per the Hindu traditions of a suvasini. Her face was peaceful and there was peace in the atmosphere around her. Everybody joined me in the Mantra "OM NAMO BHAGVATE VASUDEVAYA"

The prayer meeting like her funeral was as warm and filled with love and goodwill for the departed soul. Everyone spoke not only of her physical beauty but her gentle and loving nature. The love and affection that she had given people was evident in their talk with me. Some of them I had never seen because they were friends of her husband's brother's children. She was their Kaki Aji too!.

Lot of people had shared their personal problems with her and they were sobbing and felt the void that had passing left for them. They were sure that all their secrets were sealed within her. The housemaids were the loudest to express their grief. Kaki Aji was their savior from the clutches of vagabond husbands, a sponsor for their children's education. They were truly orphaned!

One of my elder cousins even bought some snacks for me as it is customary to take some snacks for the children in the mourning family . I was so touched that she still thought of me as the youngest sister. What wonderful emotions and sentiments are evoked on such occassions. Stories of shared memories of wonderful holidays spent in DilipKaka's Ambrai at Khandala were tearfully remembered by my cousins. Fair and lovely Bai with lovely long hair engaged to the handsome Dr.Dhurandhar was the talk of the family.

I had never expected Bai to leave her husband and go away first because she was his caretaker and was confident of remaining fit to look after him, Service and sacrifice came before self. She confessed to me that she had neglected herself like all the faithful wives in India! Loving yourself is a concept which is alien to our Indian culture. This is a humble request from me to all our womenfolk to take care of themselves first so that they remain fit to take care of the family. Loving yourself is not being selfish, but knowing when to say No and respecting yourself and protecting your own boundaries.

Bai has passed on the baton to Dr.Surekha who truely is a shining example of the pivotal figure of of the Dhurandhar family!

I request all of you to chant OM NAMMO BHAGWATE VASUDEVAYA NAMO in Bai's memory.

## पत्र प्रतिक्रिया

३० जून, २०१७

संपादिका, प्रा. सुहासिनी कीर्तिकर,
ह्यांस, स.न.वि.वि.

'प्रभु तरुणा'ची तरुणाई सुदृढ होत आहे ह्यात शंका नाही. सर्वांना धरून ठेवून पुढे जाण्याचे तुमचे कौशल्य जाणवते आहे. आपली संपादकीयही वाचायला खूप आवडतात.

माझ्याच घरातील तरुण मंडळींचा आवाका मी आताच अनुभवला. आनंदाने भरून गेलेले मन सांगत होते तो सर्व अनुभव इतरांनाही कळू दे, म्हणून हा लेख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा, ही विनंती.

आपली नम्र,
सौ. सुरेखा सुरेश नवलकर
पुणे-४११०२८
मोबा. ९३७१०३५२८९

(सौ. सुरेखा नवलकर यांच्या विवाह सुवर्णमहोत्सवाबद्दलचा लेख जागेअभावी पुढील अंकी देण्यात येईल. सुरेखाताई, तुम्हाला या महोत्सवाबद्दल शुभेच्छा.

-संपादक)

(पान ४ कॉलम ४ वरून)

माझी प्रीत जशी' आदी गाण्यांची नजाकतही सांगितली आहे. मोहनतारा या तळपदे (माहेरचे नाव) असताना हिंदी चित्रपटातूनही महम्मद रफी, मुकेश, सुरैया यांच्यासह गायिल्या आहेत हे विशेषच. रेडियोवर गाजलेलं मर्ढेकरांचं 'बदकाचं गुपित' ही त्यांच्याच स्वरात आणि भूमिकेत अवतरलं. मोहनतारा अजिंक्य यांची घेतली गेलेली खास दखल परभांना विशेष सुखावून जाणारीच. लेखक विनायक जोशी माझा विद्यार्थी हा योगायोगही सुखदच.

-संपादक

## अभिनंदन

✶ सौ. कविता राजस राणे यांना असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट म्हणून कोटक महिंद्र बँकेत बढती मिळाली.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह ॲंड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67